Scan QR code to visit... Epaper Portal

www. sahyandrinews.com

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ७२ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.५ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

# २४ तासांत राज्यात मेघगर्जने सह पावसाची शक्यता

## विदर्भात जोरदार पावसाचा अलर्ट, मिचाँग चक्रीवादळाचा राज्यावरही परिणाम

**मुंबई**–मिचाँग चक्रीवादळामुळे राज्यांत पुढील २४ तासांत मेघगर्जनेसह पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या दाबाच्या पट्ट्याचे तीव्र दाब क्षेत्रात रूपांतर झाले आहे. त्यामुळे त्याचे आता मिचॉन्ग चक्रीवादळात रूपांतर झाले आहे. त्यामुळे ४ डिसेंबर ते ५ डिसेंबरपर्यंत देशासह राज्यांत मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे.अनेक भागात पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. चक्रीवादळामुळे भारतीय हवामान विभागाने देशातील तमिळनाडू, आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. येत्या २४ तासांत महाराष्ट्रातही पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. राज्यात गेल्या अनेक दिवसांपासून अवकाळी पाऊस सुरू आहे. त्यामुळे आधीच शेतीचे मोठं नुकसान झाले आहे. आता पुन्हा एकदा राज्यात पावसाचा इशारा देण्यात आल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे.हे चक्रीवादळ आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला धडकण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. किनाऱ्यालगत येताच या चक्रीवादळामुळे ताशी ८० ते १०० किलोमीटर वेगाने जोरदार वारे वाहणार आहेत. यामुळे तमिळनाडू, आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यासह रायलसीमा, ओडिशामध्ये मुसळधार पावसाचा इशारा आहे.याशिवाय राज्यातील पूर्व विदर्भाच्या काही भागांत ढगाळ हवामानासह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. चक्रीवादळाच्या प्रभावामुळे पोषक हवामान झाल्याने विदर्भात दोन दिवस विजांसह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.



# तरुण पीडीने व्यसनाच्या आहारी न जाता खेळांकडे वळण्याची गरज–मुकेश जिवतोडे

## पावना येथे तालुका स्तरीय कबड्डी स्पर्धेचा उदघाटन सोहळा संपन्न

**भद्रावती । प्रतिनिधी**

तरुण पिढी व्यसनाच्या आहारी चालली आहे. त्यामुळे त्यांना चुकीच्या मार्गाने न जाऊ देता वेळीच थांबवणे काळाची गरज आहे. होतकरू तरुण व्यसनाच्या आहारी जाऊन त्यांचे आयुष्य तर अंधारात ढकलतातच आणि त्याबरोबर एक उज्वल भविष्याचे स्वप्नदेखील विरून जाते.त्यामुळे तरुण पीडीने व्यसनाच्या आहारी न जाता खेळांकडे वळून व्यायामाच्या माध्यमातून शरीर सुदृढ ठेवावे असे आवाहन शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी केले.छत्रपती क्रीडा मंडळ पावना (रै) येथे आयोजित भव्य पुरुष कबड्डी सामन्याच्या उदघाटन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. तालुक्यातील पावना (रै) छत्रपती क्रीडा मंडळ येथे २ दिवसीय भव्य पुरुष कबड्डी सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. याचा उदघाटन सोहळा नुकताच



संपन्न झाला. या उदघाटन कार्यक्रमाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्तीथी दर्शविली होती. याप्रसंगी खेळाळूचा परिचय करून घेत उपस्तिथ ग्रामस्थ तथा खेळाळून जिवतोडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच एकनाथ घागी, शिवसेना (उबाठा ) उपजिल्हा प्रमुख अमित निब्रड,विधानसभा संघटक सुधाकर मिलमिले, युवासेना जिल्हासमन्वयक तथा माजी नगरसेवक दिनेश यादव, युवासेना विधानसभा समन्वयक निखिल मांडवकर, युवासेना उपतालुका प्रमुख तथा ग्रामपंचायत सदस्य अक्षय ताजने, विशाल सावसाकडे, भावराव घागी व आदी मान्यवर उपस्तिथ होते.

### राजे अम्ब्रीशराव आत्राम यांच्या उपस्थितीत

# ३ राज्यातील विजयाचा भाजपा कार्यकर्त्यांनी केला जल्लोष

**अहेरी । प्रतिनिधी**

देशातील महत्त्वपूर्ण ४ राज्यातील विधानसभा निवडणूक निकालांमध्ये महत्वपूर्ण असलेल्या मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या ३ राज्यात भाजपाने ऐतिहासिक विजय प्राप्त केला असून तेलंगणामध्ये भारतीय जनता पार्टीचा आलेख ही वाढलेला आहे. या दणदणीत विजयाचा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील मुख्य चौक असलेल्या कै.राजे विश्वेश्वरराव महाराज चौकात ३ डिसेंबर ला जल्लोष करण्यात आला.यावेळी गगनभेदी फटाके फोडून आणि पेढे वाटून जल्लोष कारण्यात आला. सर्वप्रथम राजे अम्ब्रीशराव आत्राम यांनी उपस्थित भाजपा



कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून विजयाच्या शुभेच्छा दिल्या, या प्रसंगी राजे साहेब आगे बढो, हम तुम्हारे साथ है भारतीय जनता पार्टीचा विजय असो इत्यादी नाऱ्यांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.यावेळी भाजपाचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आनंद निकेतन विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या लघुलेखिका कालिंदी देशमाने सेवानिवृत्त





**वरोरा । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती व्दारा संचालित आनंद निकेतन विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या लघुलेखिका कालिंदी देशमाने या सलग ३७ वर्षे अशा प्रदिर्घ काळ लघुलेखक या पदावर सेवेत होत्या. त्या निमित्ताने सेवानिवृत्ती समारंभ आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मृणाल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.सर्वप्रथम श्रद्धेय बाबा आमटे व साधना ताई आमटे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण दीपप्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर मृणाल काळे, सत्कारमूर्ती कालिंदी देशमाने, यशवंत देशमाने प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य प्रा राधा सवाने,मुख्य लिपिक देवानंद अलोने व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. संजय साबळे यांनी ३७ वर्षे कार्यसेवेची रुपरेषा , कार्यक्रमाची भुमिका स्पष्ट केले. महाविद्यालयाचे जेष्ठ कर्मचारी बाबा वटे आपले मनोगतात देशमाने यांच्या सलग तिस वर्षांचा आशय व सेवेचा कार्यपरिचय दिला. तसेच महविद्यालयाचे उपप्राचार्य राधा सवाने. कालिंदी देशमाने यांनी ३७ वर्षांचा कार्यकाळ स्वअनुभव व्यक्त केले. कालिंदी देशमाने त्यांनी आपल्या मनोगतात श्रद्धेय बाबा व साधनाताई यांच्या समाजसेवेचा वसा महाविद्यालय व समाजाकरिता आम्ही आधी करत होतो व यापुढेही करत राहील असे प्रतिपादन केले.वरिष्ठ लिपिक कमलाकर डुकरे, संकेत कायरकर यांनीही आपले अनुभव स्वरूपाने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ मृणाल काळे , देशमाने यांचे महाविद्यालयाच्या ३७ वर्ष सेवेत असताना महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीमध्ये खूप मोलाचा वाटा आहे. विद्यापीठाचा शिक्षकेतर कर्मचारी महोत्सवात आमचे महाविद्यालयात सदैव प्रथम स्थानावर आघाडीवर आहेत याकरिता देशमाने यांचे खूप मोठ्या प्रमाणात महाविद्यालयातर्फे कौतुक केले. या सेवानिवृत्त कार्यक्रमांत विशेष म्हणजे सर्व देशमाने सहकुटुंब उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन प्रयोगशाळा सहाय्यक हिना पांडे तर आभार प्रदर्शन ग्रंथालय लिपिक मनीषा मनगटे यांनी केले या कार्यक्रमात कनिष्ठ व वरिष्ठ प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी तथा माजी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आले व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# पहिल्या महिला साहित्य संमेलनाचे हंसराज अहिर यांचे हस्ते थाटात उदघाटन

## मूल नगरीत पहिल्या महिला साहित्य संमेलनाचा अद्भुत सोहळा

**मूल । प्रतिनिधी**

झाडीबोली साहित्य मंडळ चंद्रपूर आणि झाडीबोली साहित्य मंडळ शाखा मुल यांच्या वतीने पहिल्यांदाच पहिले राज्यस्तरीय महिला झाडीबोली साहित्य संमेलन राष्ट्रमाता जिजाऊ नगरी बालविकास प्राथमिक शाळा मुल येथे रविवार ३ डिसेंबर ला पार पडले. संमेलनाध्यक्ष जेष्ठ साहित्यिक शशिकलाताई गावतुरे व स्वागताध्यक्ष प्रा. रत्नमाला भोयर यांचे उपस्थितीत राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांचे हस्ते उद्धाटन ,प्रा. रत्नमाला भोयर यांचा प्रातिनिधीक कवितासंग्रह हीरदयातील खपली व सुनिता बुटे यांच्या मनभावना कवितासंग्रहाचे



प्रकाशन तसेच झाडीबोली महिलारत्न पुरस्काराचे वितरण करण्यात आले.या साहित्य संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे नवभारत विद्यालयपासून गांधी चौक ते बालविकास प्राथमिक शाळेपर्यंत निघणाऱ्या ग्रंथदिंडीत लोककला व लोकपरंपरेचे दर्शन घडविणाऱ्या वेशभूषा , लेझीम, बँडपथक , कवायती आणि वैशिष्ट्यपूर्ण झाकी प्रदर्शित करण्यात आली . मूल नगरीतील शिक्षक , सर्व कर्मचारी व विद्यार्थी आणि नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झालेत. झाडी गौरवासाठी शाहीर नंदकिशोर मसराम व गायिका विद्या कोसे यांच्या स्वरांची जुगलबंदी रंगली होती . दुसऱ्या टप्प्यात लोकगीते आणि स्त्री साहित्य यावर प्रकाश टाकण्यासाठी डॉ. विशाखा कांबळे नागपूर , डॉ. कल्पना नरांजे नागपूर व रणरागिनी मंचाच्या अध्यक्षा संगीता बढे वर्धा यांचा परिसंवाद पार पडला. तिसऱ्या टप्प्यात झाडीची बहिणाबाई ज्येष्ठ साहित्यिक अंजनाबाई खुणे वडेगाव यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कवीसंमेलन रंगले. त्यात राज्यभरातील अनेक कवयित्रींचा सहभाग होता . याच साहित्य संमेलनात झाडीपट्टीतील साहित्यिकांचा व झाडीबोलीच्या उत्थानासाठी महत्त्वपूर्ण ठराव घेण्यात आले .मूल नगरीत झालेल्या घातलेल्या वैविध्यपूर्ण महिला साहित्य संमेलनात राज्यभरातील साहित्यिक व साहित्य रसिक , आमंत्रित मान्यवर व नागरिकांनी उपस्थिती होती . संमेलनाच्या यशस्वीतेसाठी आयोजन मंडळाने अथक परिश्रम घेतले .

# आदिवासी आश्रम शाळा जानाळा येथील विद्यार्थ्यांची इस्त्रो सहलीसाठी निवड

**मूल । प्रतिनिधी**

अनुदानित प्राथमिक तथा माध्यमिक आदिवासी आश्रम



शाळा जानाळा येथील इयत्ता नववीचा विद्यार्थी करन रामदास मडावी याची बंगलोर येथील इस्त्रोच्या सहली करीता निवड झाली आहे.एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय चंद्रपूरचे प्रकल्प अधिकारी माननीय मुरगानंथम यांच्या उपक्रमांतर्गत ५ सप्टेंबर शिक्षक दिनी ऑनलाइन उत्कृष्ट अध्यापन केल्यामुळे त्याची निवड करण्यात आली. या निवडीमागे मुख्याध्यापक काळे , वर्गशिक्षक राऊत यांचे मार्गदर्शन व मोलाचे सहकार्य लाभले तसेच सर्व शिक्षकांनी शुभेच्छा दिल्या.

# शंकरपूर येथे एटीएम सुविधा उपलब्ध करा

## उपसरपंच अशोक चौधरी यांची मागणी

**शंकरपूर । प्रतिनिधी**

शंकरपूर हे १२ हजार लोकवस्तीचे मोठे गाव असून या ठिकाणी एकही राष्ट्रीयकृत बँक नाही शंकरपूर व परिसरातील नागरिकांना विदर्भ कोकण ग्रामीण बँक या बँकेतूनच व्यवहार करावे लागतात बँकेत खूप गर्दी असते तर कधी लिंक नसते त्यामुळे पैशाचा व्यवहार करण्यासाठी नागरिकांना खूप त्रास होत आहे.सायंकाळी पाच वाजेच्या नंतर किंवा सुट्टीच्या दिवशी नागरिकांना अत्यावश्यक गरज पडल्यास शंकरपूर मध्ये कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. शंकरपूर हे मोठी बाजारपेठ असून मोठ्या प्रमाणात व्यापारी वर्ग आहे शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे तसेच व्यापाऱ्यांचे खाते विदर्भ कोकण बँकेमध्येच आहेत त्यांना वारंवार याच बँकेतून व्यवहार करावे लागतात. तसेच शंकरपूर च्या सभोवतालची ३४ खेडे या गावाला जोडलेले आहेत या सर्व गावांमधील नागरिकांचे व्यवहार हे विदर्भ कोकण बँकेमधूनच



होतात त्यामुळे विदर्भ कोकण बँकेने एटीएम सुविधा उपलब्ध करून द्यावी अशा प्रकारचे निवेदन देऊन उपसरपंच अशोक चौधरी यांनी मागणी केली आहे.

# विकास कामांबाबत कुठेही भेदभाव करण्याची भावना ठेवत नाही–आ.बाळासाहेब आजबे

**आष्ट । प्रतिनिधी**

आष्टी विधानसभा मतदारसंघाचा आमदार म्हणून जनतेने निवडून देऊन मोठा विश्वास दाखवलेला आहे मतदारसंघातील कोणत्याही गावांमध्ये विकास कामांमध्ये भेदभाव करण्याची भावना कधीही मनात ठेवलेली नाही ज्या गावांमध्ये मते कमी मिळाले आहेत तिथे विकास कामे करायची नाहीत असा विचार देखील माझ्या मनात कधी आला नाही त्यामुळे ज्या ठिकाणी विकास कामांची आवश्यकता असेल त्या त्या ठिकाणी आपण त्या कामांची पूर्तता करण्याचा प्रयत्न करत आहोत असे प्रतिपादन आ.बाळासाहेब आजबे यांनी केले.तालुक्यातील नांदूर (विठ्ठलाचे) या गावी कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे भूमिपूजन करताना ते बोलत होते यावेळी जिल्हा परिषद सदस्य सतीश शिंदे, उप अभियंता प्रशांत काकडे,संजय विधाते,उध्दव विधाते, उपस्थित होते पुढे बोलताना आ. बाळासाहेब आजबे म्हणाले की महाराष्ट्र राज्य मध्ये सध्या भारतीय जनता पार्टी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी असे तीनही पक्ष सत्तेत सहभागी असल्यामुळे कोणत्याही गावातील विकास कामांमध्ये अडचणी निर्माण होत नाहीत आज वाघळूज येथे १.७० कोटी रु. वाघळूज तांडा येथे १.६२ कोटी रू. तसेच वाघळूज येथे गेटेड बंधारा ४४ लक्ष रू . डोंगरगण येथे १.२५ कोटी रु. आणि नांदूर या ठिकाणी



आज या १.२३ कोटी रु.किंमतीच्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधारे कामांचे भूमिपूजन होत आहे आणि येथील गावकऱ्यांच्या मागणीप्रमाणे आणखी एका कोल्हापूर पद्धतीच्या बंधारा बांधकाम मंजूर व्हावे यासाठी आपण प्रयत्न केलेले असून लवकरच त्या कामाला मंजुरी देखील आपण घेणार आहोत त्यामुळे नदीला वाहून जाणारे पाणी अडवले जाणार असल्यामुळे येथील शेतकऱ्यांना सिंचनासाठी चांगली सुविधा निर्माण होणार आहे अशा प्रकारचे कोल्हापूर पद्धतीचे बंधारे मतदारसंघांमध्ये जिथे जिथे शक्य असेल तिथे आपण करणार आहोत त्याचबरोबर नांदूर गावाजवळील मेहेकरी नदीवरील पूल हा अरुंद असल्यामुळे आणि पुरेशी उंची नसल्यामुळे या ठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे या पुलावरून पिंपळा धनगरवाडी आणि परिसरातील गावातील नागरिकांना अहमदनगर कडे जाण्यासाठी या ठिकाणी उच्चस्तरीय पुलाचे बांधकाम व्हावे यासाठी आपण प्रयत्न करू असे सांगत गावातील मुस्लिम समाजाच्या कबरस्थान साठी संरक्षण भिंत कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे सांगितले या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे काम अत्यंत दर्जेदार पद्धतीने करावे यासाठी हे काम स्थानिक च्या ठेकेदार कडे न देता बाहेरच्या ठेकेदाराकडे देण्यात आले आहे गावकऱ्यांनी या कामाकडे लक्ष देऊन दर्जेदार काम करून घ्यावे असे आवाहन केले यावेळी बोलताना बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष जिल्हा परिषद सदस्य सतीश शिंदे म्हणाले की, आ.बाळासाहेब आजबे आणि पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी एकत्रितपणे शासनाकडे पाठपुरावा केल्यामुळे तालुक्यामध्ये अनेक कामे मंजूर झाले असून यापुढे विकासाची अनेक कामे होणार आहेत असे सांगितले माजी सरपंच संजय विधाते यावेळी बोलताना म्हणाले की नांदूर या गावी यापूर्वी अनेक विकास कामे मंजूर झाले आहेत परंतु बाळासाहेब आजबे यांनी देखील कोणताही पक्षपात न करता आमच्या गावातील शेतकऱ्यांना शेतीसाठी फायदा होईल असे पद्धतीच्या बंधाऱ्यांचे काम मंजूर केल्यामुळे परिसरातील नागरिक अत्यंत समाधानी आहेत असे सांगितलेया वेळी..यावेळी सतीश आबा शिंदे सुनील नाथ जगन्नाथ ढोबळे हरिभाऊ दहातोंडे महादेव डोके भाऊसाहेब घुले संतोष गुंड शिवाजी शेकडे सरपंच मसोबाची वाडी भीमराव घोडके सरपंच साहेब तेवढेगाव अर्जुन काकडे विशाल झांबरे ज्ञानेश्वर वाघ परमेश्वर कर्डिले भीमराव चव्हाण काकासाहेब कर्डिले इंजिनियर काकडे साहेब कॉन्टॅक्टर साहेब रामगोंदकर राम तात्या कर्डिले बाळासाहेब पिसाळ पप्पू शेठ लोखंडे संजय चौधरी विशाल झांबरे शामराव फसले , सचिन कोहक दिलीप चव्हाण भीमराव बोडके भरत जाधव संजय दादा विधाते सरपंच उद्धव विधाते विधाते छबू देवा रिंगणे रावसाहेब गुंड उत्तम चौधरी तुळशीराम गुंड नवनाथ राठोड गणेश पवार शिवाजी गाडे रावसाहेब दळवी बबलू शेठ संजय मामा चौधरी चंद्रकांत वामन नवनाथ शेलार दिलीप चव्हाण बंडूशेठ काका नामदेव मामा शेळके डॉक्टर गव्हाणे विशाल भामरे गणेश पवार नवनाथ शेलार शामराव कसले सतीश विरकर दादा राऊत पप्पू गवळी ज्ञानेश्वर वाघ परमेश्वर कर्डिले यांच्यासह डोंगरगण वाघलूज नांदूर परिसरातील शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दासखेड येथील पशुवैद्यकीय दवाखाना बनला शोभेची वस्तू

**पाटोदा/प्रतिनिधी**

मागील दोन वर्षांपासून दासखेड येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुधन पर्यवेक्षक पद रिक्त आहे या पदावर कंपनी मार्फत अकरा महिन्या साठी डिप्लोमा कोर्स पूर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु तो दोन तीन महीने आठवड्यात दोन वेळा यायचा परंतु कंपनीने मागील सहा महिन्यांपासून पगार बंद असल्याने तो अधीच आला नाही.परंतु कंपनीनचे पण अकरा महीन्याचे करार संपला आहे. या मुळे दासखेड, पाचंगी, बोडकेवाडी मंझरी बेडकवाडी येतील शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला आहे. दवाखाना असुन कर्मचारी नसल्याने दवाखाना सतत बंदच असतो.या मुळे दवाखाना असुन अडचण, नसुन खोळंबा अशी गत दासखेडकरांची झाली आहे. गावातील दुध उत्पादक शेतकरी यांना कृत्रीम रेतन व लंपी सारख्या अनेक आजारांनी जनावरांना घेरले आहे. परंतु शासकीय दवाखाना बंद असल्याने खाजगी पशुधन पर्यवेक्षक यांच्या कडून



उपचार करावा लागतो आहे. या दवाखान्यात औषध उपलब्ध असुन देखील ते धुळखात पडले आहे, वरीष्ठ अधिकारी यांनी या संबंधीत डॉक्टर किंवा अधिकारी यांनी दवाखानाला भेट घेऊन कायम स्वरुपी पशुधन पर्यवेक्षक द्यावा अशी शेतकरी दुध उत्पादक यांच्या कडून मागणी होते आहे. या वेळी बोलताना शेतकरी बाबु मुंडे म्हणाले की मी पाचंगी दासखेड येथे सहा वेळा आलो परंतु दवाखाना बंदच होता तर दुसरे शेतकरी संभाजी लोंढे म्हणाले की दवाखाना बंदच असल्याने खाजगी लोकांकडे जावे लागते. या अश्या अडचणी व तक्रारी अनेक शेतकऱ्यांच्या असल्यामुळे जिल्हा प्रशासनाने तात्काळ याची दखल घेऊन या गंभीर प्रश्नावर उपाय योजना कराव्यात नसता संतप्त शेतकरी लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याच्या पवित्र्यात दिसुन येते आहेत.

# सोयाबीन २५% अग्रीम विमा शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करा–गणेश कवडे

## शेतकरी चळवळ टिकली पाहिजे, पाटोदा तहसील समोर धरणे आंदोलन संपन्न

**पाटोदा/प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील काही मंडळातील शेतकऱ्यांचा पिक विमा बॅक अकाउंट मध्ये पडला, तर पाटोदा मंडळातील एका ही शेतकऱ्याला पिक विमा बॅक अकाउंट मध्ये पडला नाही. या मुळे पाटोदा मंडळातील शेतकरी बांधवांनी गणेश कवडे यांच्या नेतृत्वाखाली पाटोदा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून या शेतकऱ्यांचा आवाज शासन दरबारी मांडण्याचा प्रयत्न केला. या वेळी तहसीलदार बन साहेब यांनी १५ डिसेंबर पर्यंत उर्वरित शेतकऱ्यांच्या विमा तात्काळ जमा करू असे आश्वासन दिले या नंतर आंदोलन मागे घेण्यात आले.



या आंदोलनात तालुकाध्यक्ष शिवभुषण जाधव, सय्यद वहाब, शेख इम्रान नुर, अण्णासाहेब राऊत, रविंद्र घुमरे, योगेश ढवळे, बाबासाहेब घुमरे, देविदास काळे, राहुल नागरगोजे, लहू नागरगोजे, चेअरमन दादासाहेब घुमरे, भाऊसाहेब सानप, सुनील पोकळे, बाळासाहेब गर्जे, आबासाहेब भोसले, विलास भोसले, शंकर बामदळे, सुभाष बामदळे, बाळासाहेब जावळे, कॉ.भगवानराव जावळे, संतोष घाडगे, विठ्ठल मामा नाईकवडे, दादा वीर यांच्या सह शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते.

# गोंडवाना विद्यापीठात एकदिवसीय व्याख्यानाचे आयोजन




**गडचिरोली :–** ६ डिसेंबर ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाच्या अनुषंगाने दुपारी १२.३० वाजता, विद्यापीठ सभागृहात व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोंडगोंडवाना विद्यापीठात एकदिवसीय व्याख्यानाचे आयोजनवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे, नागपूर येथिल प्रख्यात आंबेडकरी विचारवंत तथा वरिष्ठ पत्रकार, प्रा. रणजित मेश्राम, यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारत या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाला प्र–कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे, यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप बारसागडे यांनी केले आहे.

# जागतिक अपंग दिन हा अपंग लघु उद्योजक मशरूम विक्रेते विठ्ठल चापके यांचा सत्कार करून साजरा

**परभणी । प्रतिनिधी**

आज काळी कमान (विद्यापीठ गेट समोर) येथे राष्ट्र जन फाउंडेशन महाराष्ट्र राज्याच्या वतीने जागतिक अपंग दिनानिमित्त परभणी जिल्ह्यातील अपंगाचा लघु उद्योग चैतन्य मशरूम विक्री करणारे अपंग श्री विठ्ठल चापके यांनी मागील पाच सहा वर्षांपासून अपंग असून सुद्धा चालत फिरत तीन चाकी गाड्यावर व्यवसाय काळी कमान येथे सुरू केला शून्यातून विश्व निर्माण केले आज या मशरूम मुळे अनेकांचे रोग बरे होतात म्हणून शिकलेले माणसं असून बरेच काही व्यवसाय करीत नाहीत पण हाच अपंगा कोण आदर्श घेण्यासारखा आहे म्हणूनच आज जागतिक अपंग दिनाच्या औचित्य साधून विठ्ठल चापके यांचे हार पुष्पगुच्छ देऊन सत्कार सन्मान गौरव स्वागत करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवमुद्रा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अँड सूर्यकांत मोगल पाटील कार्यक्रमाचे प्रमुख



पाहुणे उद्योजक विशाल जावळे पाटील आसोलेकर जागतिक अपंग दिन महोत्सव कार्यक्रमाचे आयोजक राष्ट्र जन फाउंडेशन परभणी संस्थापक अध्यक्ष गो सेवक नितीन जाधव गोगलगावकर त्यांनी प्रास्ताविक मध्ये बोलतानाजे सर्व आपण करू शकतो, तेच सर्व काही ते ही करूच शकतात,
गरज आहे ती त्यांना समजून घेण्याची..
खचलेल्या मनाला उभारी देण्याची..!
अपंग व्यक्तींना सहाय्य करणे म्हणजे त्यांना विविध कामे करण्यास पात्र करणे आणि त्यांच्यातील कौशल्ये विकसित करणे. आज समाजात खूप प्रकारची कामे अशी आहेत ज्यांना अपंग व्यक्ती करू शकतात. म्हणूनच अपंग बांधवांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळण्यासाठी जागतिकअपंगदिन' हा दिवस ३ डिसेंबर रोजी साजरा करण्यात येतो. सर्वांनी उद्योजकाकडे वळा व्यवसाय धंदे करा हाच खरा अपंग दिन साजरा होईल कार्यक्रमाचे स्थळ विद्यापीठ गेट समोर काळी कमान रात्री सात वाजता सत्कार स्वागत करण्यात आले अशी माहिती लोकसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली.

# रुग्णालयांतील अग्निरोधक यंत्रणा साठी निधी उपलब्ध करून द्यावा

## शासन धोरणाच्या निषेधार्थ अग्निरोधक यंत्रणेला श्रद्धांजली आंदोलन–डॉ.गणेश ढवळे

**पाटोदा/प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अधिनस्थ इतर १७ अशा एकुण १८ आरोग्य संस्थांच्या इमारती मध्ये तातडीने अग्निरोधक यंत्रणा उभारण्यात यावी या साठी तातडीने निधी द्यावा.२०२१ मध्ये भंडारा आणि अहमदनगर येथील जिल्हा रुग्णालयात लागलेल्या आगीत नवजात बालक आणि रूग्णांचा मृत्यू झाल्यानंतर शासकीय रुग्णालयातील इमारतींमध्ये अग्निरोधक यंत्रणा उभारण्यात यावी. हा विषय ऐरणीवर आला होता, या नंतर निवेदन तसेच आंदोलनानंतर अग्निरोधक यंत्रणा उभारण्यासाठी शासनाने अंदाज पत्रके मागवली होती. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने २४ कोटी ३९ लाख रुपयांची अंदाजपत्रके पाठवुन २ वर्षे उलटून ही अद्याप निधी न देण्याच्या शासनाच्या संवेदनहीन धोरणाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.४ डिसेंबर सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अग्निरोधक यंत्रणेला श्रद्धांजली वाहुन शासनाचे लक्ष्य वेधण्यासाठी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, आरोग्यमंत्री, सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांना निवेदन देण्यात आले. या वेळी आंदोलनात बीड शहरप्रमुख माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ शेख युनुस, सुदाम तांदळे, मुबीन शेख, शिवशर्मा शेलार, बाळासाहेब मुळे, धनंजय सानप आदि सहभागी होते, जानेवारी–२०२१ मध्ये भंडारा जिल्हा रुग्णालयातील ईमारतीला आग लागली. अग्निरोधक यंत्रणा नसल्याने रौद्ररूप धारण केलेल्या आगीने बालकांच्या अतिदक्षता विभागातील ११ नवजात बालके मृत्युमुखी पडली होती. त्या नंतर




१० महिन्यांनी नोव्हेंबर–२०२१ मध्ये अहमदनगर जिल्हा रुग्णालयात अशीच घटना घडली यात १० रूग्णांचा होरपळुन मृत्यू झाला होता. मात्र यातुन कोणताही धडा घेतल्याचे दिसून येत नाही.२ वर्षे उलटूनही अद्याप अग्निरोधक यंत्रणा साठी निधी देण्यात आलाच नाही.आरोग्य यंत्रणा साठी निधीची मारामारी आणि कोट्यवधींची उधळपट्टी करत शासन आपल्या दारी नागरीकांच्या जीवन मरणाचा प्रश्न असणाऱ्या आरोग्य विषयक सुविधा उदाहरणार्थ जिल्हा रुग्णालयात एम.आर.आय.तसेच कार्डियाक कॅथलॅब सुविधा तसेच जिल्हा रुग्णालयाच्या आवारातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत माता व बाल रूग्णालयासाठी २०० खाटांची स्वतंत्र इमारत मंजूर होऊन त्याचे काम सुद्धा पुर्ण झालेले आहे. मात्र विद्युतीकरण आणि लिफ्ट साठी ३ कोटी रुपयांच्या निधीच्या कमतरतेमुळे ८ महिन्यांपासून ईमारत धुळखात पडुन असुन जिल्हा रुग्णालयातील स्त्रीरोग विभागात खाटा कमी पडत असल्याने नवजात बालक व नवमातांची तारांबळ उडत आहे. मात्र त्या साठी निधी देण्यासाठी हात आखडता घेणारे शासन स्वतःची जाहिरात करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी शासन आपल्या दारी कार्यक्रमाच्या माध्यमातून करताना दिसत आहे.

# परळीतील शासन आपल्या दारी कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्ह्यात होणार विकासाची नवी नांदी

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, कृषीमंत्री धनंजय मुंडे यांसह मान्यवर राहणार उपस्थित

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथे मंगळवार दि.५ डिसेंम्बर रोजी होणाऱ्या शासन आपल्या दारी या कार्यक्रमाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील शेकडो विकासकामांचे भूमिपूजन, पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण तसेच काही नवीन प्रकल्पांची घोषणा होणार असून, हा कार्यक्रम बीड जिल्ह्याच्या विकासाची नांदी ठरणार आहे. या कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह मान्यवर तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, प्रशासनातील उच्च पदस्थ अधिकारी आदींची उपस्थिती लाभणार आहे. परळी तालुक्यातील सिरसाळा एमआयडीसी उभारणीचे भूमिपूजन, परळी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासाच्या २८६ कोटी ६८ लाख रुपयांच्या आराखड्याचे भूमिपूजन, परळी तालुक्यात कृषी विभागामार्फत उभारण्यात येत असलेल्या सोयाबीन संशोधन केंद्र, कृषी महाविद्यालय व कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय या तीन शासकीय संस्था उभारणीच्या ३११ कोटींच्या कामांचे भूमिपूजन, बीड जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीच्या ६१ कोटी








रुपयांच्या बांधकामाचे भूमिपूजन, परळी शहर बसस्थानकाच्या सुधारित कामाचे भूमिपूजन, यांसह बीड जिल्ह्यातील विविध विकासकामांचे भूमिपूजन तसेच परळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सिरसाळ्यात उभारण्यात आलेल्या कै. पंडित अण्णा मुंडे व्यापारी संकुलाचे लोकार्पण आणि जिल्ह्यातील ११ तालुक्यातील सुमारे २२ हजार लाभार्थींना विविध योजनेतील लाभाचे थेट वाटप या कार्यक्रमाच्या निमित्ताने करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांसह सर्व मान्यवर सुरुवातीला गोपीनाथगड (पांगरी) येथे येणार असून त्याठिकाणी ते लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृतिस्थळी अभिवादन करणार आहेत. त्यानंतर ते १२ ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथांचे दर्शन घेतील व त्याठिकाणी २८६.६८ कोटी रुपयांच्या वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचे भूमिपूजन करतील. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवरायांना वंदन केल्यानंतर धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतुन आयोजित स्वागत रॅलीचे आयोजन करण्यात आले असून, या रॅली नंतर थेट कार्यक्रम स्थळी वैद्यनाथ कॉलेज समोरील मैदान येथे येतील व मुख्य शासकीय कार्यक्रमास सुरुवात होईल. दरम्यान शासकीय कार्यक्रमास सुरुवात होण्या अगोदर कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून व ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली परळी शहरात प्रथम आगमनानिमित्त सर्व मान्यवरांच्या अभूतपूर्व स्वागत रॅलीचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज चौकातून करण्यात येत आहे. या रॅलीसाठी संपूर्ण परळी शहर दिवाळी सारखे सजले असून, या रॅलीत महायुतीतील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार आहे. या स्वागत रॅली मध्ये मणिपूर, केरळ, तिरुपती बालाजी, आंध्र प्रदेश, पंजाब, मुंबई आदी सहा ठिकाणावरून खास बँड पथक पाचारण करण्यात आले आहेत. तसेच पुष्पवृष्टी व रोषणाईद्वारे अभूतपूर्व स्वागत या ठिकाणी करण्यात येईल. या रॅलीचा शेवट मौलाना आझाद चौकात आल्यानंतर होईल व त्यानंतर मुख्य शासकीय कार्यक्रमास सुरुवात होईल.

# भाजप अजित पवारांचं काय करतंय, हे टप्प्याटप्प्यानं बघा

## अजित पवार गटाच्या खांद्यावर बंदुक ठेऊन भाजप काम करतंय, रोहित पवार

**मुंबई–**५ राज्यांच्या निकालावर प्रतिक्रिया देताना आमदार रोहित पवार यांनी शिंदे व अजित पवार गटाला टोला लगावला. तसेच, तेलंगणातील विजयाचा फायदा विदर्भ व मराठवाड्यात महाविकास आघाडीला होईल, असेही ते म्हणाले. तसेच सिंधियांप्रमाणे शिंदे आणि अजित पवार गटाचंही राजकीय अस्तित्त्व संपवले जाईल का असा प्रश्न शिंदे व अजित पवार गटाला पडला असेल, असे रोहित पवार यांनी म्हटले.''मध्य प्रदेशमध्ये भाजपाने काँग्रेसच्या नेत्यांना जवळं केले, त्यांना जवळ करुन सरकार बनवले. पण, यंदाच्या विधानसभा निवडणुकीत केंद्रीयमंत्री ज्योतिर्रादित्य सिंधिया यांच्या कार्यक्षेत्रात काँग्रेसला यश मिळाले आहे. म्हणजेच, भाजपाने सिंधियांना सोबत घेऊन त्याचे राजकीय अस्तित्व संपवण्याचा प्रयत्न केलाय'' असे रोहित पवार यांनी म्हंटले.

''भाजपाकडून तसेच केले जाते, जे मध्य प्रदेशात केले, तेच महाराष्ट्रात होईल का, सिंधियांप्रमाणे शिंदे आणि अजित पवार




गटाचंही राजकीय अस्तित्त्व संपवलं जाईल का, असा प्रश्न शिंदे व अजित पवार गटाला पडला असेल, असे रोहित पवार यांनी म्हटले. तसेच, तेलंगणातील काँग्रेसच्या विजयाचा फायदा विदर्भ आणि मराठवाड्यात काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादीला होईल, असेही रोहित पवार यांनी म्हटले.भाजपाचा तीन राज्यातील विजय हा अजित पवारांचा पायगुण असल्याचं अमोल मिटकरी यांनी म्हटलं, याबाबत रोहित पवारांना विचारलं असता, अंधविश्वासावर आमचा विश्वास नाही. भाजपा अजित पवारांचं काय करतंय, हे टप्प्याटप्प्यानं बघा. आजही तुम्हाला सह्या घेतल्यानंतर दुसऱ्या उपमुख्यमंत्र्यांच्या टेबलवरुन मुख्यमंत्र्यांच्या टेबलवर फाईल्स पाठवाव्या लागतात. अजित पवार गटाच्या खांद्यावर बंदुक ठेऊन भाजपा काम करतंय. भाजपाकडून दिलेली स्क्रीप्ट त्यांच्या भाषणात दिसते, भाजपाने सांगितलेलं ते बोलत आहेत, असे म्हणत रोहित पवार यांनी अजित पवार गटावरही हल्लाबोल केला.

# लोकसभेला माझा ताशा वाजेल, राज ठाकरे

## तर काहींना माझ्या ताशाच्या कानठळ्याही बसतील म्हणत मारला जोरदार टोला


**मुंबई–**चार-पाच राज्यांचे आजच निकाल आपल्यापर्यंत आलेले आहेत. पुढच्या वर्षी लोकसभेच्या निवडणुका होतील असे विधान मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केले आहे. बाजूला वाजणाऱ्या ढोल ताशांकडे इशारा करत या ढोल ताशांपेक्षा जास्त ताशा माझा वाजला जाईल असेही राज ठाकरे म्हणाले.मनसेकडून मुंबईतील काळाचौकी येथे कोकण महोत्सवाचे आयोजन केले आहे. आज महोत्सवाचा रविवारी तिसरा दिवस होता. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या कोकण महोत्सवाला भेट दिली. त्यावेळी उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी बोलतांना त्यांनी देशातील चार राज्यातील निवडणुकीच्या निकालांवर भाष्य केले.पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले की, काहीजणांना माझ्या ताशाच्या कानठळ्या बसतील, काही जणांना माझ्या ताशाच्या कानठळ्या बसतील. कल्पना नाही, पण जे काही बोलायचं आहे ते पुढल्या वर्षी बोलू, असा सूचक इशारा राज ठाकरे यांनी दिला आहे.तसेच जनतेला उद्देशून ''तुम्ही मालक आहात आणि बाकीचे आलेले भाडेकरू आहेत हे लक्षात ठेवा. तुमचा हक्क घालवू नका असे राज ठाकरे यांनी म्हटले. तसेच



अभिमानाने ताठ मानेने येथे राहिले पाहिजे, असे राज यांनी म्हटले. स्थानिक मराठी-परप्रांतीय, मराठी पाट्या आणि मांसाहारी-शाकाहारीच्या मुद्यावरून मागील काही दिवसांपासून वाद सुरू असताना राज ठाकरे यांनी हे सूचक वक्तव्य केले आहे.सर्वोच्च न्यायालयाने दोन महिन्यांत सर्व पाट्या दुकानदारांनी मराठी स्थानिक भाषेत करावेत, असे आदेश दिले होते. त्याची मुदत २५ नोव्हेंबर रोजी संपली. त्यानंतर मुंबईतील अनेक परिसरातील इंग्रजी पाट्या हटवून मराठी पाट्या लावण्यात आल्या. त्यासाठी मनसे कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत सगळ्यांना आवाहन केलं. त्यानंतर ज्या ठिकाणी इंग्रजी पाट्या दिसल्या त्याठिकाणी आंदोलन झाले. काही ठिकाणी मनसेने आक्रमक पवित्रा घेतला. तर, दुसरीकडे मुंबई महापालिकेनेदेखील मराठी पाट्या नसणाऱ्या दुकानांवर कारवाई सुरू केली आहे.

# भारताचा इतिहास विजयाचा, शौर्याचा, सागरी सामर्थ्याचा–पंतप्रधान नरेंद्र मोदी

**सिंधुदुर्ग–**पंतप्रधान नरेंद्र मोदी सिंधुदुर्गात दाखल झाले आहेत. त्यांनी राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केले. यावेळी राज्यपाल रमेश बैस, केंद्रीय मंत्री राजनाथसिंह, केंद्रीय मंत्री नारायण राणे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांची देखील उपस्थिती होती. पुतळ्याचे अनावर केल्यानंतर त्यांनी आर्ट गॅलरीची देखील पाहणी केली. त्यानंतर झच् मोदींचा ताफा नौदल दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमाकडे दाखल झाला. तारकर्ली बीचवर नौदलाच्या प्रदर्शनाचे त्यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी भारतीय नौदलातील रँकचे नामकरण भारतीय परंपरांनुसार ठेवण्याची घोषणा केली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पंतप्रधान मोदी यांनी नौदलाचे महत्त्व विषद केले. ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांना सागरी सुरक्षेचे महत्त्व माहिती होते. समुद्रावर नियंत्रण असणारा सर्वशक्तिमान असतो हे त्यांना ठावूक होते. त्यामुळे त्यांनी एका शक्तिशाली नौदलाची बांधणी केली.त्यांच्यापासूनच प्रेरणा घेत आज भारत गुलामीची मानसिकता सोडून पुढे जात आहे. नौदल अधिकारी जे एपौलेट्स घालतात त्यावर आता आता छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रतिबिंब दिसून येईल, असे ते म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी भारतीय नौदल आता आपल्या रँकचे नामकरण भारतीय परंपरांनुसार करणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली होती. नौदल आता आपल्या विविध रँक्सचे नामकरण भारतीय परंपरांना अनुरूप करेल. सरकार सशस्त्र दलांत नारीशक्ती वाढवण्यावर जोर देत आहे.छत्रपती शिवरायांच्या काळातील जे किल्ले बनवले गेले. त्याचे संवर्धन करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार बांधिल आहे. त्यासाठी करोडो रुपये खर्च केला जात आहे. येथून आपल्याला विकसीत भारताची वाट पाहायची आहे. तर पर्यटनातून मोठ्या प्रमाणात उद्योग व्यवसायाला देखील गती मिळेल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. मोदी पुढे म्हणाले की, देशातील लोकांचे सिंधुदुर्गाप्रती प्रेम निर्माण होत आहे. जनसामान्य या देवभूमीशी जोडले जात आहे. नेव्ही संकल्पना ही छत्रपती शिवाजी महाराज यांनी सुरु केली. हे देखील विदेशवासियांना कळेल.मोदी म्हणाले की, पुर्वीचे सरकार हे समुद्री किनाऱ्यावरील लगत गावांना आपले मानत नव्हते. त्यामुळे सी-सेक्टर लगत असलेल्या गावांसाठी या सरकारने विकासाचा निर्णय घेतला. त्यामुळे देशात



मस्त्यउद्योग देखील ८० टक्के वाढला. त्याचबरोबर सागरमला योजनेच्या माध्यमातून संपूर्ण किनारपट्टीवर सुविधा पुरवल्या जात आहेत. सी-फूड प्रोसेसिंग उद्योगावर भर दिला जात आहे. मच्छेमारी करणाऱ्यांना मदत दिली जात आहे. कोकणचे हे क्षेत्र अदभूत आहे. याच्या विकासासाठी आम्ही काम करत आहोत.पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, सिंधुदुर्गाचा ऐतिहासीक किल्ला, सर्वत्र पसरलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रताप, हा सर्व भारत वासीयांना प्रेरणा देणार आहे. 'बढो नया कमाल हो, झुको नही, रुको नही, बढे चलो, बढे चलो, असे म्हणत त्यांनी नौदला शुभेच्छा दिल्या. मातृभूमीसाठी समर्पण दिलेल्या सैनिकांना त्यांनी नमन केले. मोदी म्हणाले की, सिंधुदुर्गाच्या ऐतिहासीक किल्ल्याला पाहून सर्व भारतीयांना गर्व वाटतो. छत्रपती शिवाजी महाराज यांना माहिती होते की, सागरी किनाऱ्यावर नियंत्रण असले तर शक्तीशाली असतो. त्यांनी अनेक योद्धांना येथे तयार केले. तेच योद्धे सर्वांना प्रेरणा दायी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांकडून प्रेरणा घेऊन भारत गुलामगिरीच्या मानसिकतून बाहेर पडून भारताचा विकास होत आहे.शेकडो वर्षांपूर्वी टेक्नॉलॉजी नव्हती तेव्हा आम्ही सिंधुदुर्गात किल्ले बनवले. एकेकाळी सुरतच्या बंदरावर ८० पेक्षा जास्त देशाचे जहाज राहत होते. भारताच्या याच सामर्थ्याच्या आधारावर दक्षिण पूर्व आशियाच्या देशांनी आपला व्यापार वाढवला. विदेशी ताकदांनी आक्रमण केलं तेव्हा आपल्या संस्कृतीवर निशाणा साधला. जो भारत जहाज बनवण्यात प्रसिद्ध होता त्याची कला, कौशल्या सर्व काही ठप्प करण्यात आलं. भारत आता विकसित होण्याच्या लक्ष्यावर जात आहे, आल्याला आपल्या गौरवाला परत आणायचं आहे. आमचं सरकार प्रत्येक क्षेत्रात काम करत आहे. भारत ब्लू इकॉनॉमीला प्रोत्साहन देत आहे. भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थसत्ता बनण्याच्या दृष्टीने प्रवास करत आहे. अवकाश आणि समुद्रात जगाला भारताचं सामर्थ्य दिसत आहे, असं नरेंद्र मोदी म्हणाले.मोदी म्हणाले की, नौदलाच्या ध्वजाला छत्रपती शिवरायांच्या इतिहासाशी जोडण्यात त्यांनी मला संधी मिळाली हे माझे नशीब समजेल. भारतीय नौदल आपल्या सशक्त लेव्हल शिपवर देशातील पहिल्या महिला कमांडरला नियुक्ती केली आहे. भारत आपले लक्ष मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहे. भारताकडे लक्ष्य करण्यासाठी एक ताकद आहे. त्यामागे भारतीय १४० कोटी लोकांची शक्ती आहे. यामागे लोकांचे इच्छा, आकांशा या जोडला गेल्या आहेत. सर्व राज्यातील लोक राष्ट्र प्रथम या भावनेने ओतप्रोत आहे. देश पुढे तर आम्ही पुढे जाऊ हीच भावना देशाच्या नागरिकांची आहे. लोकांनी नकारात्मकतेची राजकारण सोडून प्रत्येक क्षेत्रात पुढे नेण्याचा विचार आहे.

सह्याद्रीचा राखणदार



# शिक्षकांना शिकवू द्या, विद्यार्थ्यांना शिकू द्या

## विधानभवनावर धडकणार प्राथमिक शिक्षकांचा आक्रोश मोर्चा

**वर्धा । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांतील शिक्षकांना दैनंदिन अध्यापनाच्या कामापासून दूर ठेवणार्या शासनाच्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणात अडथळे निर्माण होत आहे.त्यामुळे शिक्षकांना शिकवू द्या, विद्यार्थ्यांना शिकू द्या, असा नारा देत ११ डिसेंबर रोजी प्राथमिक शिक्षकांचा आक्रोश मोर्चा विधानभवनावर धडकणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी सोमवार ४ डिसेंबर ला स्थानिक जलसंपदा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित पत्रपरिषदेत दिली.राज्यात प्राथमिक शिक्षकांच्या अनेक मागण्या दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. शासनाकडून इतर शासकीय कर्मचारी व खाजगी अनुदानित शाळांतील शिक्षकांच्या तुलनेत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शिक्षकांना दुय्यम वागणूक दिली जाते.




त्यामुळे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने विद्यार्थ्यांसह शिक्षकांच्या मागण्यांसाठी हा आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचेही कोंबे यांनी यावेळी सांगितले.कमी पटसंख्येच्या नावाखाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा बंद अथवा समायोजित करू नये, शाळा समूह योजना रद्द करावी, दत्तक शाळा योजना रद्द करावी, रिक्त जागा त्वरित भराव्या, कंत्राटी शिक्षण स्वयंसेवक पद्धत बंद करावी, दररोजची आभासी कामे, वेगवेगळे अ‍ॅप्स, सतत दिल्या जाणार्या लिंक्स तसेच गुणवत्ता संवर्धनाच्या नावाखाली उपक्रमांची भरमार बंद करावी, बीएलओसह सर्वच अशैक्षणिक कामे बंद करावी, विद्यार्थ्यांच्या उपस्थिती भत्त्यात वाढ करावी, विद्यार्थ्यांना बसण्यासाठी वर्गात आसनपट्ट्या, डेस्क-बेंच उपलब्ध करून द्यावे, यासह अन्य मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी या आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याचेही विजय कोंबे यांनी यावेळी सांगितले.मोर्चा ११ डिसेंबरला सकाळी ११ वाजता यशवंत स्टेडियम नागपूर येथून निघणार आहे. या मोर्चात राज्यातील २५ हजारांपेक्षा अधिक शिक्षक सहभागी होणार असून वर्धा जिल्ह्यातील जवळपास १३०० शिक्षक सहभाग घेणार असल्याचेही विजय कोंबे यांनी सांगितले. पत्रपरिषदेला राज्य कार्यकारिणी सदस्य सुधीर सगणे, जिल्हा सल्लागार चंद्रशेखर ठाकरे, जिल्हा उपाध्यक्ष विनोद महाजन, मनीष ठाकरे, श्रीकांत केंडे, पवन बानोकर, रामदास खेकारे, श्रीकांत अहेरराव, अतुल उडदे, प्रशांत निंभोरकर, राजेश महाबुधे उपस्थित होते.

## चंद्रपूर जिल्ह्यातील फ्लाईंग क्लबचे काम वेगाने पूर्ण करा

### वने, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील मोरवा विमानतळावर फ्लाईंग क्लब येत्या २६ जानेवारी २०२४ पर्यंत सुरू करण्याचा संकल्प असून, या अनुषंगाने प्रशासकीय स्तरावर वेगाने कार्यवाही करण्याचे निर्देश वने, सांस्कृतिक कार्य मंत्री व पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. नागपूर फ्लाईंग क्लबच्या सेस्ना - १७२ आर. या चार आसनी विमानाचे मोरवा विमानतळावर प्रात्यक्षिक घेण्यात आले आहे. फ्लाईंग क्लब संदर्भातील कामांची रीतसर परवानगी घेऊन धावपट्टीचे कार्पेटिंग,धावपट्टीच्या दुरुस्ती आणि संरक्षण भिंती ही कामे वेगाने पूर्ण करावीत, सूचना देखील यावेळी ना. मुनगंटीवार यांनी दिल्या.ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रपूर येथील फ्लाईंग क्लब



संदर्भात आढावा बैठक सह्याद्री अतिथी येथे आज घेण्यात आली. नक्षलग्रस्त व आदिवासी जिल्ह्यातील युवक-युवतींना वैमानिक होता यावे, यासाठी चंद्रपूर येथे फ्लाईंग क्लब स्थापन करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात १० प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी किमान ३ शिकाऊ विमाने खरेदी करणे आवश्यक आहे. याशिवाय, सीएसआर फंडातून उद्योगपतींकडून अशी शिकाऊ विमाने मिळण्यासंदर्भात कार्यवाही करण्याच्या सूचनाही संबंधितांना मंत्री मुनगंटीवार यांनी दिल्या. या फ्लाईंग क्लबबाबत नागपूर अधिवेशन कालावधीत बैठक घेण्यात येईल असेही ना मुनगंटीवार यांनी सांगितले.या बैठकीस सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे नागपूरहून विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी चंद्रपूर विनय गौडा, एमएडीसी चे मंगेश कुलकर्णी उपस्थित होते.

## एचआयव्हीचा प्रसार कमी करण्यासाठी जनजागृती महत्वाची- राहुल कर्डिले

**वर्धा । प्रतिनिधी**

एचआयव्हीवर कायमस्वरुपी इलाज नसला तरी या आजाराचा प्रसार कमी करण्यासाठी काळजी व दक्षता घेणे आवश्यक आहे. एचआयव्हीचा प्रसार कमी करण्यासाठी जनजागृती महत्वाची आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी एड्स जनजागृती कार्यक्रमात केले.

दि.१ डिसेंबर या जागतिक एड्स दिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या सिंधुताई सपकाळ सभागृहात एड्स जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव विवेक देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सचिन तडस, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रा.ज. पराडकर, उत्कर्षा जनकल्याण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.अभ्युदय मेघे, नोबल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रविण हिवरे, वैद्यकिय जनजागृती मंचेचे अध्यक्ष डॉ. सचिन पावडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी नुरुल हक शेख आदी



उपस्थित होते. पुढे बोलतांना राहुल कर्डिले म्हणाले, एचआयव्ही बाधितांशी भेदभाव न करता सन्मानाची वागणूक द्यावी. यावेळी त्यांनी जिल्हा एड्स व प्रतिबंध विभागाच्या कामाचे कौतुक सुध्दा केले. यावेळी विवेक देशमुख, डॉ. सचिन तडस, डॉ. रा.ज. पराडकर, अभ्युदय मेघे, प्रविण हिवरे यांनी सुध्दा उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावर्षीच्या एड्स जनजागृती कार्यक्रमाचे घोषवाक्य आता नेतृत्व व आघाडी समुदायांची वाटचाल एड्स संपविण्याच्या दिशेने आहे हे आहे. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्याहस्ते आरआरसी महाविद्यालयाच्या समन्वयकांना प्रशस्तिपत्र देण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. दिव्यांनी थुल, विजय ओझा, अमित छल्लानी, ज्योत्सना गावंडे, नितीन साखरे, आनंद काळबांडे, माधुरी भोयर, सारिका ढोके, नितीन थुल, मुक्तार शेख, शुभांगी रेवतकर, सुचिता बोभाटे, वैशाली मैद, नोबल शिक्षण संस्था, उत्कर्ष जनकल्याण शिक्षण व विविध महाविद्यालय व वैद्यकीय जनजागृती मंचच्या पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

## जलयुक्त शिवार अभियान २.० मध्ये जिल्ह्यातील २३६ गावे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या वतीने जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान २.० राबविण्यात येत आहे. या अभियानात जिल्ह्यातील २३६ गावांची निवड झाली असून अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी आज आढावा बैठक घेतली.जिल्हाधिकारी कार्यालयातील वीस कलमी सभागृहात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो) अजय चरडे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, जिल्हा जलसंधारण अधिकारी निलीमा मंडीपे, राजुराचे उपविभागीय जलसंधारण अधिकारी पोहन बलकी यांच्यासह दूर दृश्य प्रणालीद्वारे संबंधित तालुक्याचे उपविभागीय अधिकारी यांची उपस्थिती होती.जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, जलयुक्त शिवार अभियान २.० साठी तालुकानिहाय २३६ गावांची निवड करण्यात आली असून विभागानुसार कृती आराखडे तयार करण्यात आले आहे. त्यामुळे विभागनिहाय यंत्रणांनी प्रत्येक कामाचा



तालुकानिहाय नियमित आढावा घ्यावा. योजनानिहाय अंदाजपत्रके तयार करावीत. उपलब्ध निधी नुसार संबंधित कामाचे विभाजन करावे. जिल्ह्यातील उपविभागीय अधिकाऱ्यांनी यंत्रणा निहाय असलेच्या कामांची माहिती घ्यावी. तसेच विभागांनी तयार केलेले कृती आराखडे तपासून घ्यावे. त्यासोबतच कामाकरीता कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्याच्या सूचना दिल्या.यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी यंत्रणांच्या आराखडयाबाबत माहिती व कृषी, जलसंधारण, वनविभाग व जिल्हा परिषद जलसंधारण विभागामार्फत असलेल्या कामांची सद्यस्थिती जाणून घेतली.

## वर्धेत विविध मागण्यांसाठी अंगणवाडी कर्मचार्यांचा मोर्चा

**वर्धा । प्रतिनिधी**

अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी ४ डिसेंबर पासून बेमुदत संप पुकारला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीच्या वतीने जिल्हा परिषदेवर मोर्चा काढण्यात आला.अंगणवाडी कर्मचार्यांच्या विविध मागण्यांकरिता ४ डिसेंबरपासून बेमुदत संप पुकारण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून निघालेला हा मोर्चा जिल्हा परिषदेसमोर आणण्यात आला. यावेळी कर्मचाऱ्यांनी विविध घोषणा देत जिल्हा परिषदेचा परिसर दणाणून सोडला. मोर्चामध्ये अंगणवाडी कर्मचार्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. अंगणवाडी कर्मचार्यांना शासकीय कर्मचार्यांचा दर्जा द्यावा, शासकीय वेतनश्रेणी व भत्ते देण्यात यावे, कर्मचार्यांना दरमहा पेंशन, आजारपणाची रजा, मिनी अंगणवाडी सेविका यांना मोठ्या अंगणवाडी सेविकाप्रमाणे मानधन, अंगणवाडी केंद्राचे भाडेवाढ, पुरक पोषण आहार रक्कम वाढ, चांगल्या दर्जाचे कार्यक्षम मोबाईल व दरमहा ३०० रुपये मोबाईल



रिचार्ज, पोषण ट्रॅकर अ‍ॅप्स संपूर्ण मराठीमध्ये तसेच सेवानिवृत्त झालेल्या अंगणवाडी कर्मचार्यांना सेवानिवृत्ती लाभ द्यावा, यासह प्रधानमंत्री जिवनज्योती, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व अंगणवाडी कार्यकर्ती विमा योजना तात्काळ देण्यात याव्या, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.या आंदोलनात दिलीप उटाणे, विजया पावडे, मंगला इंगोले, वंदना कोळणकर, मैना उईके, ज्ञानेश्वरी डंभारे, सुरेखा रोहणकर, रेखा काचोळे, सुलभा तिरभाने, वंदना रेवतकर, अरुणा नागोसे, सिमा गढ़ीया, रंजना तांबेकर, सुनंदा आखाडे, माला भगत, विजया पावडे, हिरा बावणे, भैय्या देशकर, गुंफा कटारे, अर्चना मोकाशी, रंजिता मून, रंजना सावरकर, कल्पना गोडे, जया इंगोले, चित्रा भोंगाडे यांच्यासह अंगणवाडी कर्मचार्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

## शिवसेनेची पीकविमा कंपनीच्या कार्यालयात तोडफोड, कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात खरीप हंगामात अतिवृष्टी व पूरामुळे सोयाबीन व कापूस या पिकांचे मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत पिकविमा काढल्याने ओरीऐंटल इन्शुरन्स कंपनीला पिकांच्या नुकसानीपोटी जिल्ह्यातील ४७ हजार शेतकऱ्यांना २४ कोटी रूपये वितरीत करणे आवश्यक होते.मात्र, कंपनीने केवळ ११ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर केवळ ५ कोटी रूपये वितरीत केल्याने संतप्त झालेल्या शिवसैनिकांनी कंपनीचे कार्यालय गाठत कार्यालयातील खुर्च्या, संगणक, प्रिंटर, टेबलाची तोडफोड केली आहे. कंपनीतील कर्मचाऱ्यांशी धक्काबुकी करण्याचा प्रयत्न केला.जिल्हयात चालू खरीप हंगामात सोयाबीन पिकावर किड व रोगाचा व्यापक प्रमाणात प्रादुर्भाव होवून पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते. प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या तरतुदीतील हंगामातील प्रतिकुल परिस्थिती या



जोखमेच्या बाबीअंतर्गत अधिसूचना लागू करण्यात आली होती. त्यात ४६ हजार ९९२ शेतकऱ्यांचा समावेश असून ओरीऐंटल इन्शुरन्स कंपनीने अग्रीमासाठी २३.८० कोटी रुपये मंजुर केले आहे. आतापर्यंत ११ हजार २७७ शेतकऱ्यांना ४.९४ कोटी रुपयाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. तर उर्वरीत रक्कम जमा करण्याची कार्यवाही कंपनीमार्फत सुरू होती.मात्र, अशातच ४ डिसेंबर २०२३ सोमवारला शिवसेना उबाठाचे जिल्हाप्रमुख संदिप गिऱ्हे यांच्या नेतृत्वात शिवसैनिकांनी कंपनीचे कार्यालय गाठत पिकविम्यांचे पैसे अद्याप का दिले नाही म्हणत कार्यालयातील संगणक, प्रिंटर, टेबल, खुर्ची व इतर साहित्यांची तोडफोड केली. तात्काळ शेतकऱ्यांना पिक विमा द्या अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शिवसेनेने दिला.

## महागाईमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात वाढ झाली परंतु उत्पन्न वाढले नाही-डॉ.नामदेव किरसान

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

२ डिसेंबर ला मौजा पाहार्णी ता. नागभीड जि. चंद्रपूर येथे नवयुवक नाट्य कला मंडळ, पाहार्णीच्या वतीने आयोजित धागा......एक बंध प्रेमाचा या नाट्यप्रयोगाच्या उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी महासचिव तथा गडचिरोली-चिमूर लोकसभा समन्वयक डॉ. नामदेव किरसान यांनी मोदी सरकारने आश्वासन दिल्याप्रमाणे शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट झाले नाही मात्र खताच्या, कीटकनाशकाच्या, बियाण्यांच्या किंमती वाढल्यामुळे उत्पादन खर्चात दुपटीने वाढ झाली. त्यामुळे याचा विचार करून शासनाने हमीभाव जाहीर करावा अशी मागणी केली. यावेळी प्रयोगाचे उद्घाटक चिमूर विधानसभा क्षेत्राचे समन्वयक डॉ. सतीश वारजूकर, ओबीसी विभाग संघटक धनराज मुंगले, तालुका कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष प्रमोद चौधरी, डॉ. मोहन जगनाडे, माजी अध्यक्ष



संजय गांधी निराधार योजना विनोदभाऊ बोरकर, माजी सभापती प्रफुल खापर्डे, माझी जि प सदस्य खोजराम मरसकोले, माजी नगरसेवक दिनेश गावंडे, माजी सभापती पूनम वाघमारे, सरपंच हेमंत लांजेवार, संजय माकोडे, पुरुषोत्तम बगमारे, भूपेश कोरे, सरपंच रोशन वाघमारे, उपसरपंच रामकृष्ण देशमुख, सरपंच कमलाकर ठवरे, संदीप कोरे, गजानन उरकुडे, मान्यवर मंडळी व मोठ्या संख्येने प्रेक्षक उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .